दैनिक महाराष्ट्र
# सूर्योदय
www.esuryodaylive.com
Email : suryodaykokan.123@gmail.com
मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
अक्षय संभाजी कामठे (संपादक पुणे आवृत्ती)




पुणे ‖ वर्ष ६ वे ‖ अंक ९१ ‖ रविवार २९ मार्च २०२६ ‖ RNI No.MAHMAR/2014/54581 ‖ Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 ‖ पाने ४ किंमत २ रुपये ‖

## हत्तीरोग निर्मूलनासाठी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) मोहिमेला वेग – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई :महाराष्ट्रासह देशभरात हत्तीरोग (लिम्फॅटिक फिलेरियासिस) निर्मूलनासाठी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) अर्थात आयव्हरमेक्टिन, डीईसी (डायइथिलकार्बामाझीन) आणि अल्बेंडाझोल या औषधांच्या संयुक्त उपचाराला गती देण्यात येत आहे. केंद्र शासनाने २०२७ पर्यंत भारतातून फिलेरियासिसचा पूर्णतः नायनाट करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

या मोहिमेत राज्य शासनाने सक्रिय सहभाग घेतला असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.ङ्गङ्गमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की,विशेषतः दुर्लक्षित असलेल्या फिलेरियासिससारख्या आजारांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी केंद्रीय ङ्गआरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने सुरुवात केली होती. देशात २०१७ मध्ये सर्वात प्रथम महाराष्ट्रात विशेषतः विदर्भातील जिल्ह्यांना या औषधोपचारासाठी सर्वोच्च प्राधान्य देण्याची केंद्र शासनाकडे विनंती केली होती. यामुळे महाराष्ट्रातील, विशेषतः विदर्भातील आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांचे दुःख मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होत आहे. तसेच, भारतातून फिलेरियासिस निर्मूलन करण्याच्या पंतप्रधानांच्या स्वप्नपूर्तीतही मोठा वाटा उचलून या उपक्रमात महाराष्ट्र शासन पूर्ण सहकार्य देत आहे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या माध्यमातून देशातील १२ राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर 'मास ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन' (एमडीए) मोहीम राबवली जात असून, त्यामध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे. या मोहिमेत पात्र नागरिकांना दरवर्षी प्रतिबंधात्मक औषधे दिली जातात, ज्यामुळे रोगाचा प्रसार रोखण्यास मदत होते.

राज्यामध्ये विशेष म्हणजे, काही निवडक जिल्ह्यांमध्ये पारंपरिक दोन औषधांऐवजी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) वापरली जात आहे. ही उपचारपद्धती अधिक प्रभावी मानली जाते आणि कमी कालावधीत रोग नियंत्रणात आणण्यास मदत करते.ङ्गङ्गमहाराष्ट्रातील विदर्भ विभागात हत्तीरोगाचा मोठा प्रादुर्भाव असून, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर यासारख्या जिल्ह्यांमध्ये विशेष मोहिमा राबवण्यात येत आहेत. राज्यात सुमारे ५५ लाख नागरिकांना या औषधोपचाराचा लाभ देण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

तज्ज्ञांच्या मते, 'आयडीए' उपचारामुळे मायक्रोफिलेरिया (परजीवी) कमी करण्यास अधिक परिणामकारक मदत होते,

त्यामुळे रोगाचा प्रसार लवकर थांबवता येतो. राज्य शासनाकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, अफवांवर विश्वास न ठेवता आरोग्य कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली ही औषधे घ्यावीत. समाजाच्या सक्रिय सहभागाशिवाय फिलेरियासिस निर्मूलन शक्य नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.ङ्गङ्गमहाराष्ट्रातील या आजाराचा प्रादुर्भाव हा नागपूर, चंद्रपूर, भंडारा, वर्धा, गडचिरोली, अमरावती, अकोला, लातूर, धाराशिव, सोलापूर, जळगाव, सिंधुदुर्ग, नांदेड, ठाणे, पालघर, नंदुरबार, सोलापूर आणि यवतमाळ या १८ जिल्ह्यात या रोगाचा प्रादुर्भाव आहे. फेब्रुवारी २०२६ च्या ताज्या अहवालानुसार, महाराष्ट्रातील हत्तीरोगाच्या एकूण प्रकरणांपैकी सुमारे ७५ टक्के रुग्ण एकट्या नागपूर विभागात आहेत. ङ्गङ्गसर्वाधिक प्रभावित पाच जिल्हे: भंडारा, चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली आणि गोंदिया.ङ्गट्रीपल ड्रग पॉलिसी ( आयडीए) यशाचा दर: नागपूर ग्रामीण भागात या मोहिमेमुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर ( एमएफ रेट) २०१४ मधील ४.९१ टक्क्यावरून २०२४ पर्यंत एक ङ्ग टक्क्यापेक्षा कमी आणण्यात यश आले आहे.

## कर कमी, पण दर नाही कमी; पेट्रोलवरच्या अबकारी करात घट, युद्धपरिणामांपासून ग्राहकांचे रक्षण

नवी दिल्ली : केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात प्रति लिटर १० रुपयांची कपात जाहीर केली आहे. मात्र यामुळे ग्राहकांना मिळणाऱ्या पेट्रोल-डिझेलच्या दरात कपात होण्याची शक्यता नाही. आखाती युद्धामुळे अपेक्षित असलेली दरवाढ झेलावी लागणार नाही हाच त्यांच्यासाठी दिलासा असेल. दरम्यान, खासगी कंपन्यांकडून होणारा इंधनाचा नफेखोर व्यापार रोखण्यासाठी सरकारने डिझेल आणि विमान इंधनाच्या निर्यातीवर पुन्हा एकदा विंडफॉल टॅक्स लागू केला आहे.

उत्पादन शुल्कात कपात करूनही पेट्रोल पंपांवरील किरकोळ किमतींमध्ये घट होणार नाही. पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी स्पष्ट केले की, सध्या तेल कंपन्यांना पेट्रोलवर प्रति लिटर २४ रुपये आणि डिझेलवर ३० रुपये तोटा सहन करावा लागत आहे. उत्पादन शुल्कातील ही कपात तेल कंपन्यांच्या या तोट्याची भरपाई करण्यासाठी वापरली जाईल, ज्यामुळे ग्राहकांवर नवीन दरवाढ लादली जाणार नाही.

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनी सांगितले की, कच्च्या तेलाच्या किमती ७० डॉलरवरून थेट १०० डॉलरच्या पार गेल्या आहेत. त्यामुळे एकतर वाढीव किमतींचा भार ग्राहकांवर टाकणे किंवा स्वतः महसुली तोटा सहन करणे असे दोनच पर्याय सरकारसमोर होते. तेव्हा सरकारने दुसरा पर्याय निवडला. या निर्णयामुळे सरकारला सुमारे ७,००० कोटी रुपयांच्या महसुलावर पाणी सोडावे लागणार आहे, तर निर्यात करातून साधारण १,५०० कोटी रुपयांची कमाई अपेक्षित आहे.किमतीतील फरक : शेजारील देशांमध्ये आणि युरोप-अमेरिकेत इंधन दरात ३० ते ५० टक्क्यांनी वाढ झाली असताना, भारताने एप्रिल २०२२ पासून किमती स्थिर ठेवल्या आहेत. मध्यपूर्वेतील संघर्षामुळे समुद्री मार्गांत अडथळे निर्माण झाले आहेत, ज्याचा परिणाम एलपीजी पुरवठ्यावर झाला आहे. नेपाळ, भूतान, बांगलादेश आणि श्रीलंका या देशांना केल्या जाणाऱ्या इंधन निर्यातीवर हा नवा कर लागू होणार नाही. उत्पादन शुल्कातील कपातीमुळे नागरिकांचे वाढत्या




किमतींपासून संरक्षण होईल. देशांतर्गत बाजारपेठेत इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध राहावा, यासाठीच निर्यातीवर कर लावण्यात आला आहे, असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटले आहे.

महसुली तोटा

सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात प्रति लिटर १० रुपयांची कपात केल्याने सरकारी तिजोरीवर मोठा भार पडणार असून केवळ १५ दिवसांत जवळपास ७००० कोटी रुपयांचा महसुली तोटा होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

विमानांची तिकिटे महागणार?

रशिया-युक्रेन युद्ध आणि मध्यपूर्वेतील तणावामुळे जागतिक स्तरावर इंधनाचे दर गगनाला भिडले आहेत. याचा फायदा घेत अनेक रिफायनरी कंपन्या देशांतर्गत विक्रीऐवजी विदेशात निर्यात करून मोठा नफा कमवत होत्या. यावर लगाम लावण्यासाठी सरकारने डिझेल निर्यातीवर २१.५० रुपये प्रति लिटर शुल्क, विमान इंधनावर २९.५० रुपये प्रति लिटर शुल्क लागू केले आहे. हे शुल्क जुलै २०२२ मध्ये पहिल्यांदा लागू करण्यात आले होते आणि डिसेंबर २०२४ मध्ये मागे घेण्यात आले होते. आता बदलत्या परिस्थितीनुसार ते पुन्हा लागू करण्यात आले आहे.

लॉकडाऊन नाही - पुरी

देशात कोविड-१९सारखी टाळेबंदी अर्थात लॉकडाऊन लागू होणार असल्याच्या अफवा पसरल्या आहेत. असा कोणताही प्रस्ताव केंद्र सरकारच्या विचाराधीन नाही, असे केंद्रीय मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी शुक्रवारी स्पष्ट केले. देशात पेट्रोल पंपांवर खरेदीची गर्दी उसळल्याच्या आणि गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात तुटवडा असल्याच्या बातम्या येत आहेत. यामुळे देशभरात लॉकडाऊनबाबतच्या अफवा पसरल्या होत्या. पुरी यांनी एक्सवर पोस्ट करून त्या खोडून काढल्या. इंधन, ऊर्जा आणि इतर आवश्यक वस्तूंचा अखंड पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी सर्व आवश्यक पावले उचलली जात आहेत. उद्भवणाऱ्या कोणत्याही आव्हानांना सामोरे जाण्यास आम्ही पूर्णपणे तयार आहोत, असेही त्यांनी सांगितले.

## पुणे विद्यापीठात विद्यार्थ्यांचे आंदोलन; 'अपघाती कुलगुरू हटवा, विद्यापीठ वाचवा'च्या घोषणा

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठमधील कथित प्रशासकीय अनागोंदी आणि खालावलेल्या शैक्षणिक दर्जाच्या निषेधार्थ आज विविध विद्यार्थी संघटनांनी विद्यापीठ परिसरात जोरदार निदर्शने केली. 'अपघाती कुलगुरू हटवा, विद्यापीठ वाचवा' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.




आंदोलक विद्यार्थ्यांनी आरोप केला की, विद्यापीठाचा कारभार सध्या अकार्यक्षम पद्धतीने सुरू असून प्रशासनाच्या चुकीच्या निर्णयांमुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. देशातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था म्हणून ओळख असलेल्या या विद्यापीठाच्या शैक्षणिक क्रमवारीत मोठी घसरण झाल्याचा दावा विद्यार्थ्यांनी केला. विद्यार्थ्यांच्या म्हणण्यानुसार, 'राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान' अंतर्गत मिळालेला सुमारे ६२ कोटी रुपयांचा निधी अद्याप अखर्चित असून, ही प्रशासनाच्या अकार्यक्षमतेची मोठी साक्ष आहे. हा निधी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी न वापरल्याने अनेक प्रकल्प रखडल्याचा आरोप करण्यात आला.तसेच, परीक्षा संचालक आणि अधिष्ठाता यांसारखी महत्त्वाची प्रशासकीय पदे सध्या प्रभारी किंवा अतिरिक्त कार्यभारावर चालवली जात असल्याने निर्णयप्रक्रियेवर परिणाम होत असल्याचे आंदोलकांनी नमूद केले. प्राध्यापक भरती समिती, करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम तसेच संशोधनाशी संबंधित समित्यांचे गठन दीर्घकाळापासून प्रलंबित असल्याचाही आरोप करण्यात आला.जोपर्यंत प्रशासन या गंभीर प्रश्नांची दखल घेत नाही आणि कुलगुरूंच्या राजीनाम्यासह इतर मागण्या मान्य करत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील. प्रशासकीय दिरंगाईमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले असून, विद्यापीठाची प्रतिष्ठा वाचवण्यासाठी लढा अधिक तीव्र करण्यात येईल.शिव बरौले, विद्यार्थी प्रतिनिधी

९० दिवसांपासून निकाल रखडले

सुमारे पाच लाख विद्यार्थ्यांचे परीक्षेचे निकाल गेल्या ९० दिवसांपासून रखडले असून, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याशिवाय कुलसचिवांच्या नियुक्तीशी संबंधित गोपनीय अहवाल फुटल्याचा गंभीर आरोप करत संबंधित दोषींवर कडक कारवाईची मागणी विद्यार्थ्यांनी केली. यावेळी 'कमवा व शिका' योजनेच्या मानधनात महागाईनुसार वाढ करणे, प्लेसमेंट सेल अधिक सक्षम करणे, तसेच पीएचडीशी संबंधित प्रलंबित समित्या तात्काळ स्थापन करणे अशा विविध मागण्यांचे निवेदन प्रशासनाला देण्यात आले.

## एकादशीच्या शिंगणापूर यात्रेसाठी हजारो भक्त पाई – कावडी सह मार्गस्थ

नीरा नरसिंहपूर - शंभो शिवा पार्वती हरहर महादेवच्या गजर करत हजारो भक्तगण शिखर शिंगणापूरकडे धावत चालले आहेत. कर्नाटक, मराठवाडा, विदर्भाकडून शेकडो कावडी, धजी व काठ्या मागील सात दिवसापासून एकादशीच्या शिंगणापूर यात्रेसाठी पायी चालत चालले आहेत. रस्त्याने भक्तांना चहा, नाष्टा, जेवणावळीच्या पंगती घालून भक्तांचा आशिर्वाद घेण्याची चढाओढच लागली आहे. मागील सात दिवसांपासून भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.परभणी, गंगाखेड, धाराशिव, बीड, लातूर, गेवराई, तुळजापूर, केज, अंबेजोगाई आदिसह मराठवाडा, विदर्भातून शेकडो कावडीसह हजारो लहान बालके, महिला व पुरुष भक्तगण रात्रंदिवस चालत चालले आहेत. पाडव्याच्या दुसरी दिवशी घरातून पायी चालत निघालेले भक्त एकादशीला शिंगणापूर येथे पोहोचतात. लाखो भक्तांचे स्रध्दास्थान असलेल्या शिव पार्वतीच्या दर्शनासाठी राज्यातून भक्तगण हजेरी लावतात. मानाच्या अभिषेक घातल्यानंतर भक्तगण आपआपल्या कावडीसह मंदिरात जावून तेल चढवतात व त्यानंतर परतीचा प्रवास सुरू होतो. मराठवाडा व विदर्भातून पायी चालत चाललेल्या भक्तगण नरसिंहपूर येथील निराभिमा संगमावर अंघोळकरुन नरसिंहाचे दर्शन करुन पुढे मार्गस्थ होतात. बावडा नरसिंहपूर मार्गावर आडोबावस्ती, टण्णू, पिंपरी बुद्रूक, गणेशवाडी, बावडा, लाखेवाडी,



निरवांगी आदी गावात चहा, नाष्टा, जेवणावळी घालून नागरीक भक्ती करताना दिसत आहेत. ङ्गचौकट - बाजरीची व ज्वारीची भाकरी, आमटी, लापसी, ठेचा, कांदा, काकडी, मसाले भात, गरा, बटाटे व वांग्याची भाजी, पुऱ्या, मट्टा, शरबत, चहा, कॉफी असा शाही जेवणाचा थाट करण्यात येत आहे. तर महिला, अबालवृद्ध, जेष्ठा बरोबर तरूण सायंकाळचा मुक्काम मंदिर, कार्यालय, सार्वजनिक ठिकाणी करत आहेत. परंतू महावितरणच्या बोटचेपी धोरणामुळे सायंकाळी सहा ते रात्री दहा पर्यंत विद्युत पुरवठा खंडित ठेवण्यात येत असल्याने मच्छर मध्ये झोप लागत नाही. एकतर दिवसभर चालून थकवा आलेला असतो आणि वरून विजेअभावी मच्छर चावल्याने झोप लागत नसल्याचे अनेकांनी सांगितले.

## महिला मेळावा उत्साहपुर्ण वातावरणात संपन्न

केज - तालुक्यातील पैठण येथे केंद्रस्तरीय महिला मेळावा अर्थात सन्मान स्त्री शक्तीचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते हा कार्यक्रम अतिशय उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाला .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केज पंचायत समितीच्या ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मुमताज पठाण मॅडम या होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून पैठणच्या सरपंच जयश्रीताई चौधरी पाथरा गावच्या सरपंच अपर्णाताई पवार तसेच



सावळेश्वरच्या डॉक्टर भाग्यश्रीताई मस्के मुख्याध्यापक सुशिलकुमार गायकवाड , केंद्रप्रमुख संजय चवरे , अर्जून बोराडे, तुकाराम देशमुख ,मुख्याध्यापक सुरेश काळे हे होते. यावेळी पैठण गावातील ज्येष्ठ नागरिक तथा आदर्श माता श्रीमती गजराबाई प्रभाकर सरवदे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला . तसेच सौ संजीवनीताई केंद्रे , सौ ज्योतीताई चवरे , सुधेशनाताई देशमुख , मिराताई बोराडे , सुरेखाताई भोसले , सविताताई जाधव , बबीताताई गायकवाड , अश्विनीताई चौधरी, सुरेखाताई काळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला . यावेळी पैठण केंद्रांतर्गत सर्व गावातील आदर्श माता , सामाजिक कार्यकर्त्या व कार्यरत सर्व जिल्हा परिषद शाळांच्या शिक्षिकांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी केंद्रीय मुख्याध्यापक गोविंद मुळे , केंद्रप्रमुख अण्णासाहेब जाधव व सर्व शाळांचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद यांनी विशेष परिश्रम घेतले.

संपादकीय

## कोकणचा राजा' जायबंदी!

फेब्रुवारी ते जून या पाच महिन्यांच्या कालावधीत मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फळ मार्केटमधील उलाढालीला कमालीची गती मिळालेली असते. फळ मार्केटमध्ये देशाच्या कानाकोपऱ्यांतून तसेच परराज्यातूनही फळे विक्रीला येत असतात. या मार्केटमध्ये देशाच्या अनेक राज्यांतून आंबे विक्रीला येत असले तरी कोकणचा हापूस हा आंबा खवय्यांच्या पसंतीचा असतो. वर्षभर वाट पाहिलं, पण खाल्ला तर हापूसच खाईन, असे आंबाप्रेमी अभिमानाने सांगत असतात. गुढीपाडवा, अक्षय्य तृतीया, राम नवमी व अन्य सणांना घराघरांमध्ये हापूस आंब्याच्या रसाचा कार्यक्रम ठरलेलाच असतो. त्यामुळे अन्य दिवसांच्या तुलनेत या दिवसांसाठी आंबा विक्रीच्या उलाढालीचा आलेख कमालीचा उंचावलेला असतो. कोकणच्या रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग अशा तीन जिल्ह्यांतून मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, पनवेल येथील नागरिकांसाठी आंबा विक्रीला येत असला तरी रायगडच्या तुलनेत रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील हापूसला अधिक मागणी असते व चवीचा दर्जाही काही वेगळाच असतो. भाज्या आणि फळभाज्या मार्केटमध्ये विक्रीला शेतकऱ्यांकडून थेट येत असतात. हापूस आंब्याचे गणित त्या तुलनेत वेगळे असते. मार्केटमध्ये आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी आंबा थेट विक्रीला पाठविण्याचे प्रमाण नगण्य असते. मार्केटमधील व्यापारीच कोकणात जाऊन थेट बागांचाच सौदा करत असल्याने फळांचे पैसे शेतकऱ्याला जागेवरच उपलब्ध होत असतात. गुढीपाडव्याच्या दिनी मार्केटमध्ये कोट्यवधी रुपयांची उलाढाल आंबा विक्रीतून झालेली आहे. खवय्यांची आंब्याला असलेली पसंती पाहून अन्य राज्यातील आंबा उत्पादक महाराष्ट्रातील शहरी भागातील मार्केटमध्ये आंबा विक्रीला पाठवत असतात. कोकणच्या हापूसच्या खालोखाल कर्नाटकच्या आंब्याने मार्केट व्यापलेले असते. एपीएमसी मार्केटमधील प्रत्येक विंगमधील गाळ्यागाळ्यावर हापूस आंब्यांनी जागा व्यापलेली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातून रत्नागिरी, लांजा, राजापूर भागातून तर सिंधुदुर्गचा देवगड हापूस विक्रीला आला आहे. रायगड जिल्ह्यातील किनारपट्टी भागातूनही हापूस आंबा विक्रीला आला आहे. जानेवारी महिन्यापासूनच हापूस आंब्याची मार्केटला तुरळक आवक येण्यास सुरुवात होते, एप्रिलच्या मध्यापासून हापूस आंब्याची आवक वाढून दररोज लाखांच्या संख्येने हापूस आंब्याच्या पेट्या मार्केटमध्ये विक्रीला येत असतात. आवक वाढल्यावर याच कालावधीत हापूस आंब्याचे दर सर्वसामान्यांच्या आवाक्यात येतात. मार्केटमध्ये कोकणच्या हापूस आंब्याव्यतिरिक्त केरळ, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातूनही काही प्रमाणात 'हापूस' सदृश आंबा विक्रीसाठी येत असतो. दरवर्षीच्या तुलनेत हापूस आंब्याची आवक कमी झालेली आहे. फुलोऱ्याच्या वेळी झालेल्या अवकाळी पावसामुळे आणि कीड हल्ल्यांमुळे आंब्याच्या काढणीला विलंब झाला असून, रत्नागिरी आणि देवगड हापूसची आवक घटली आहे आणि शहरभरातील हंगामाच्या सुरुवातीच्या पुरवठ्याचे स्वरूप बदलले आहे. आंबा आवकच मंदावल्याने किमती गगनभरारी घेत आहेत. हापूसचे दर ५ ते ९ डझनाच्या पेटीचे २ ते ८ हजार रुपये आहेत. आखाती युद्ध सुरू असल्याने हापूस आंब्याची हक्काची बाजारपेठ ओळखली जाणाऱ्या आखाती देशांमध्ये हापूसची निर्यात अजून सुरू झालेली नाही व युद्धामुळे लवकर निर्यात होण्याची शक्यताही नाही. त्यामुळे स्थानिक बाजारातील मार्केटमध्ये आंबा विकला जाणार असल्याने यंदा खवय्यांना आंबा मुबलक प्रमाणावर उपलब्ध होणार आहे.गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर मुंबई शहर व उपनगरामध्ये जवळपास ३२ कोटी ५० लाख रुपयांच्या आंब्याची विक्री झाली आहे. यामध्ये १० कोटी रुपयांच्या कर्नाटक आंब्याची, तर उर्वरित २२ कोटी ५० लाख रुपयांच्या कोकणमधून आलेल्या हापूस आंब्याची विक्री झालेली आहे. युरोपीय देशांमधून हापूस आंब्याला फारशी मागणी नसल्याने आंबा उत्पादक शेतकऱ्यांना आखाती देशांमधील बाजारपेठांवर अवलंबून राहावे लागत आहे. आखाती युद्धामुळे रमजानचा महिना असतानाही अन्य फळांची विक्री न झाल्याने फळ उत्पादकांना यंदा प्रचंड फटका बसला आहे. इराण आपला फळांचा मुख्य ग्राहक असून कलिंगड, डाळिंबसह अन्य भारतीय फळांना रमजानच्या महिन्यात इराणमधून सर्वाधिक मागणी असते.



चिपळूण अर्बन बँकेच्या नूतन इमारतीच्या उद्घाटनानिमित्त अध्यक्ष मोहन मिरगल व संचालक मंडळाचे अभिनंदन करताना माजी नगरसेवक बिलाल पालकर.सिकंदर पालकर,सतीश खेडेकर,निहार गुडेकर, रत्नदीप देवळेकर,समीर जानवरकर, रहिमान दलवाई आणि मान्यवर छायाचित्रात दिसत आहेत (छाया : ओंकार रेळेकर)

# गोरेगांवमध्ये ऐतिहासिक रामनवमी मिरवणूक; दलित वस्तीतून प्रथमच सुरुवात

विशेष प्रतिनिधी

नंदकुमार चांदोरकर

गोरेगाव : गोरेगांव शहरात यंदाचा श्रीराम नवमी उत्सव अभूतपूर्व उत्साहात साजरा झाला. विशेष म्हणजे, इतिहासात पहिल्यांदाच संत रोहिदास महाराज नगर या दलित वस्तीतून श्रीराम नवमीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या निर्णयामुळे सामाजिक एकात्मतेचा अनोखा संदेश दिला गेला.ङ्गबजरंग दल गोरेगांव लोणेरे विभाग आणि श्रीराम नवमी उत्सव समितीच्या वतीने आयोजित या उत्सवात शहरातील असंख्य भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. महिलांची उपस्थिती विशेष लक्षणीय होती. श्रीरामांचे दर्शन, चरणस्पर्श आणि आरती करण्यासाठी भाविकांमध्ये मोठी उत्सुकता दिसून आली.ङ्गसंत रोहिदास नगर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचे काम गेल्या १३ वर्षांपासून प्रलंबित होते. यंदा मंदिराच्या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांनी मिरवणुकीची सुरुवात येथे करण्याची विनंती केली. समितीने यावर सकारात्मक निर्णय घेत, सर्वानुमते हा ऐतिहासिक उपक्रम राबवला.ङ्गमिरवणुकीत श्रीरामांची भव्य मूर्ती, आकर्षक रथ, भगवे ध्वज आणि पारंपरिक वाद्यांचा समावेश होता. रणरागिणी लेझीम पथक, महाड यांनी सादर केलेल्या नृत्याने उपस्थितांची मने जिंकली, तर ताराराणी ढोल-ताशा पथक, मुरुड यांच्या दमदार वादनाने वातावरण दणाणून गेले.ङ्गशहरातील नागरिकांनी घरासमोर रांगोळ्या काढून, आरत्या सजवून मिरवणुकीचे स्वागत केले. संपूर्ण गोरेगांव शहर राममय झाले होते. भक्तिगीते, आरत्या आणि घोषणांनी वातावरण भक्तीमय झाले.ङ्गउत्सवाच्या सांगता प्रसंगी रामचरितमानसाचे अखंड पठण, आरती आणि प्रसाद वितरण करण्यात आले. यावेळी मंत्री भरतशेठ गोगावले तसेच विविध मान्यवर उपस्थित होते. गोरेगांव पोलीस दलाने मिरवणुकीचे नियोजन सुरळीत पार पाडत चोख बंदोबस्त ठेवला.ङ्गएकूणच, यंदाचा रामनवमी उत्सव सामाजिक सलोखा आणि एकात्मतेचा संदेश देणारा ठरला.



## करंजाणी येथे महिलेचा मृत्यू



दापोली प्रतिनिधी- करंजाणी दर्भाचीवाडी येथे ८१ वर्षीय वृध्द महिलेचे झोपेतच निधन झाल्याची घटना गुरूवारी सकाळी उघडकीस आली. सुलोचना श्रीपत साळवी या आपल्या राहत्या घरात निश्चल अवस्थेत आढळून आल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.ङ्गमिळालेल्या माहितीनुसार, सकाळी साडेदहाच्या सुमारास शेजारी राहणाऱ्या नातेवाईकांनी त्यांना नेहमीप्रमाणे हाक मारली असता कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. घराच्या पडवीलगत असलेल्या बेडरूममध्ये त्या अंगावर ब्लँकेट घेऊन पलंगावर उताण्या अवस्थेत पडलेल्या दिसून आल्या. त्यांना हलवून उठविण्याचा प्रयत्न केला असता कोणतीही हालचाल जाणवले नाही. यामुळे नातेवाईकांनी तातडीने खात्री केली असता त्यांचे निधन झाल्याचे स्पष्ट झाले.याबाबत दापोली पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून अन्य शक्यता पडताळण्याचे काम दापोली पोलिसांकडून सुरू आहे.

# न्यू इंग्लिश स्कूल म्हसळा ईथे वृक्षारोपण व स्वच्छता अभियान संपन्न

द. रा. जि. उपसपंदाक: संतोष उध्दरकर

म्हसळा: जागतिक वन दिन व पर्यावरण पूरक होळी या राष्ट्रीय दीना निमित्त न्यू इंग्लिश स्कूल म्हसळा शाळेत वृक्षारोपण करण्यात आले प्रत्येकाने एक झाड लावावे व त्याचे संवर्धन करावे असा सल्ला  वनक्षेत्रपल पी. एम. पाटील यांनी आवर्जून विध्यार्थ्यांना सांगितले.शासनाच्या हरितक्रांती शाळेच्या माध्यमातून अनेक उपक्रम राबविण्यात आले असता या मध्ये चित्रकला स्पर्धा,निबंध स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा,शालेय साहित्य वाटप,वृक्षाची ओळख, रोपवाटिकेचे महत्व,इत्यादी कार्य व संकल्पना हे सामाजिक वनिकरन म्हसळा विभाग राबविण्यात अग्रेसर असतो अशे मनोगत भीमराव सूर्यतळ यांनी गीताच्या रचनेतून गाऊन दाखवले. मुला मुलींनी पर्यवरण चे महत्व भाषणाच्या माध्यमातुन सांगितले. वसावे सर. पाटील सर,मोरे सर,मडवी सर. चव्हाण सर.यांनी देखील मार्गदर्शन केले.वनरक्षक आकाश गायकर यांनी सर्वांचे आभार मानले.व प्रत्येक राष्ट्रीय दिन व सण साजरे करूया असे आश्वासित केले. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





## वाकवलीमध्ये विहिरीत पडून महिलेचा मृत्यू

दापोली प्रतिनिधी :- दापोली तालुक्यातील वाकवली (गवळवाडी) येथे विहिरीत पडून एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना २५ मार्च रोजी सकाळी उघडकीस आली. नीता विनायक खेडेकर (३९, रा. सुशेरी, ता. खेड) असे या महिलेचे नाव आहे.ङ्गयाबाबत दापोली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित महिला मागील १२ वर्षांपासून मानसिक आजाराने त्रस्त असून तिच्यावर उपचार सुरू होते. २४ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास त्या घरातून बाहेर पडल्या होत्या. त्यानंतर त्या परत न आल्याने खेड पोलीस ठाण्यात बेपत्ता म्हणून नोंद करण्यात आली होती. दरम्यान, २५ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजण्याच्या सुमारास वाकवली येथील सुनील लक्ष्मण बिर्वटकर यांच्या मालकीच्या विहिरीमध्ये त्या मृतावस्थेत आढळून आल्या. याप्रकरणी दापोली पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# कोकणचे सुपुत्र सुप्रसिद्ध सनई वादनात संदेश मुरुडकर यांचा 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये ऐतिहासिक विक्रम; कोकणच्या 'खालू बाजा' लोककलेचा ५ एप्रिल रोजी मुंबईत रंगणार रौप्य महोत्सवी ऐतिहासिक सोहळा

दापोली प्रतिनिधी:

कोकणची लोकप्रिय पारंपरिक लोककला 'खालू बाजा' (आगरी-कोळ्यांचा सन्मान असलेला टिमकी बाजा) आज मुंबई शहरातून नष्ट होण्याच्या मार्गावर असताना, तिला पुनरुज्जीवित करून प्रतिष्ठित दर्जा मिळवून देण्याचे महान कार्य दापोली तालुक्यातील इळणे गावचे सुपुत्र सुप्रसिद्ध सनई वादक संदेश मुरुडकर आणि त्यांचे लहान भाऊ आंतरराष्ट्रीय शिट्टी वादक रुपेश मुरुडकर यांनी केले आहे. आपल्या मंत्रमुग्ध करणाऱ्या सनई वादनाने या कलेला ऐतिहासिक वळण देत संदेश मुरुडकर यांनी सलग सनई वादन करून प्रतिष्ठेच्या इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स ( ) मध्ये आपले नाव सुवर्ण अक्षरात कोरले आहे. संदेश मुरुडकर यांच्या या अद्वितीय कामगिरीचे आणि कलेप्रती असलेल्या निष्ठेचे सध्या संपूर्ण भारतातून विशेष कौतुक होत आहे.ङ्गमुंबईसारख्या महानगरात ही पारंपरिक कला जिवंत ठेवण्यासाठी धाकटे बंधू रुपेश मुरुडकर यांनी मोलाचे योगदान दिले असून, हे पथक सुरू करण्यासाठी त्यांनी सन २००० मध्ये पुढाकार घेतला होता. गेल्या २५ वर्षांत अनेक संकटे, अडचणी आणि संघर्षावर मात करत मुरुडकर बंधूंनी आपल्या वाडवडिलांची ही कला जिवापाड जपत जिवंत ठेवली आहे. त्यांचे त्रिमूर्ती संदेश खालू बाजा आणि नृत्य पथक हे मुंबईत शासकीय स्तरावर नोंदणीकृत () असून, या पथकाने लोककलेला एका सन्माननीय स्तरावर नेऊन ठेवले आहे.




या उल्लेखनीय कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक मंत्री ना. आशिषजी शेलार यांनी संदेश मुरुडकर यांचा सन्मानपत्र देऊन विशेष गौरव केला. पारंपरिक लोककला जोपासल्याबद्दल त्यांनी संदेश मुरुडकर यांचे भरभरून कौतुक केले. याप्रसंगी मुंबई भाजपचे सचिव जितेंद्र राऊत, वॉर्ड अध्यक्ष प्रसाद जाधव, समाजसेविका लता सुभाष पालवणकर, मंगेश आंबोकर आणि रुपेश मुरुडकर उपस्थित होते.ङ्गया पथकाला मुंबईत २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त ५ एप्रिल २०२६ रोजी रौप्य महोत्सवी वर्षाचा शानदार सोहळा सांस्कृतिक मंत्री आशिषजी शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे. खालू बाजा या लोककलेला शासकीय मेळाव्यांमध्ये हक्काचे स्थान मिळवून देण्यासाठी मुरुडकर बंधूंचे प्रामाणिक प्रयत्न सुरू असून, कोकणी संस्कृतीचा हा अनमोल वारसा जपणाऱ्या संदेश मुरुडकर यांच्यावर सध्या सर्वच स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# भारतीय सैनिकांना मिळाल्या शत्रूला दणका देणार प्रहार लाईट मशिन गन




ग्वाल्हेर : भारतीय लष्कराचे सामर्थ्य आता आणखी वाढणार आहे. मेक इन इंडिया अंतर्गत तयार झालेल्या तब्बल दोन हजार प्रहार लाईट मशिन गन जवानांना मिळाल्या आहेत. अदानी डिफेन्स अँड एरोस्पेस कंपनीने या शस्त्राची निर्मिती केली आहे. लवकरच आणखी प्रहार लाईट मशिन गन भारताच्या जवानांना मिळणार आहेत.अदानी डिफेन्स अँड एरोस्पेस कंपनीने एका विशेष सोहळ्यात प्रहार लाईट मशिन गनची पहिली बॅच भारतीय लष्कराला सुपूर्द केली. याप्रसंगी संरक्षण मंत्रालयाचे खरेदी विभागाचे महासंचालक ए. अंबरासू, अदानी डिफेन्स अँड एरोस्पेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष राजवंशी तसेच अदानी डिफेन्सचे इतर अधिकारी उपस्थित होते. अंबरासू यांनी लष्करासाठीच्या एलएमजी अर्थात प्रहार लाईट मशिन गनने भरलेल्या ट्रकला हिरवा झेंडा दाखवला. यानंतर ट्रक लष्कराच्या छावणीच्या दिशेने रवाना झाला.अदानी डिफेन्स अँड एरोस्पेस कंपनीने विहित कालावधीच्या ११ महिने आधीच तब्बल दोन हजार प्रहार लाईट मशिन गन पुरवठा केला आहे. प्रयोग करून अंतिम निर्मित करण्यासाठी सात वर्षांचा कालावधी देण्यात आला होता. पण कंपनीने सहा वर्ष आणि एक महिना या कालावधीत गनचा पुरवठा केला. नियोजनानुसार पुढील तीन वर्षांत लष्कराच्या मागणीनुसार पूर्ण पुरवठा केला जाणार असल्याची ग्वाही अदानी डिफेन्स अँड एरोस्पेस कंपनीने दिला आहे. कंपनीकडे ४० हजार एलएमजीची ऑर्डर आली आहे. यापैकी दोन हजार गन लष्कराला मिळाल्या असून उर्वरित गनचा पुरवठा अदानी डिफेन्स अँड एरोस्पेस कंपनी पुढील तीन वर्षांत करणार आहे.

प्रहार एलएमजीची प्रमुख वैशिष्ट्ये : पायदळ सैनिकांची लढण्याची क्षमता वाढवते ७.६२ मिमी कॅलिबरची प्रहार एलएमजी सैनिकांना वेगाने गोळीबार करण्याची आणि शत्रूवर दबाव निर्माण करण्याची संधी मिळवून देते. प्रहार एलएमजी ओपन-बोल्ट, गॅसवर चालणारी एलएमजी आहे, जिचे वजन ७.६ किलो आहे

# लोकरंग

१ साप्ताहिक संवाद

आखाती युद्धाचे दुष्परिणाम आणि आव्हान

इस्रायल अमेरिका आणि इराण या देशांमध्ये मागील ३ आठवड्यापासून घनघोर युद्ध सुरु आहे. या युद्धाचा जगभरातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेवर दुष्परिणाम होताना दिसतो आहे. पेट्रोल,डिझेल,सीएनजी आणि पेट्रोलियम गॅस या सारख्या रोजच्या जीवनात अत्यावश्यक असलेल्या इंधनाचा आता देशात तुडवडा भासू लागलेला आहे. एकूणच,या युद्धाचे दुष्परिणाम आता दिसू लागले असून लवकरच देशात पेट्रोलियम लॉक्? डाऊन होण्याची संभावना देखील आहे. या युद्धाचे नेमके दुष्परिणाम जाणून घेण्यासाठी आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक अनय जोगळेकर यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.



१ आखाती देशांच्या युद्धाचे भारतावर काय दुष्परिणाम होत आहेत?

मागील ३ सप्ताहापासून आखाती देशांमध्ये म्हणजेच अमेरिका,इराण आणि इस्रायल या देशांमध्ये युद्ध सुरु आहे. या युद्धाचे भारतीय अर्थव्यवस्थेवर आणि इंधन व्यवस्थेवर दुष्परिणाम जाणवू लागेलेले आहेत. या युद्धाच्या भीतीमुळे जगभरातील गुंतवणूकदार आपली गुंतवणूक काढून घेऊ लागल्यामुळे शेअर बाजार सातत्याने कोसळतो आहेच शिवाय रुपयाचे अवमूल्यन होत आहे. रुपया रोजच्या रोज नीचांकी पातळी गाठत आहे. वाहनासाठी आवश्यक पेट्रोल,डिझेल आणि सीएनजी वायू तसेच घरगुती आणि व्यावसायिक वापरासाठी असलेले गॅस सिलेंडर देखील मिळत नसल्याने किंवा टायचा पुरवठा खंडित झाल्याने देशभरता इंधन तुडवडा भासत आहे.त्याचा हॉटेल व्यवसायावर भयानक परिणाम जाणवतो आहे. देशातील शेतकऱ्यांना देखील या युद्धाचा फटका बसत असून निर्यातीचा माल जाऊ शकत नसल्यामुळे आर्थिक फटका बसत आहे.

२या दुष्परिणामाचे आव्हान स्वीकारत भारताने या परिस्थितीचा सामना करण्यासाठी काय तयारी केली आहे?

आपल्या पंत्रप्रधानांनी युद्धाच्या दुष्परिणामांच्या अनुषंगाने कालच सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. आपल्या देशाचा आर्थिक पाया सध्या तरी मजबूत असून सरकार बदलत्या परिस्थीकडे अगदी बारकाईने लक्ष ठेऊन आहे. आयात निर्यात संबंधी अडचणी सोडविण्यासाठी आंतर मंत्रालयीन गट तयार केले आहेत. जागतिक संघर्षामुळे तेल,वायू आणि खतांच्या पुरवठ्यावर परिणाम होऊ शकतो हे लक्षात घेऊन देशाची तग धरण्याची क्षमता वाढविण्याकडे सरकारचे लक्ष आहे. करून काळाप्रमाणे सर्व राज्यांनी मिळून या खडतर परिस्थीशी सामना करावा असे पंतप्रधानांनी आवाहन केले आहे.

३मेड इन इंडिया जहाजबांधींच्या माध्यमातून आत्मनिर्भरतेकडे वाटचाल सुरु आहे का?

होय देशाचे प्रदेशावरील अवलंबित्व कमी करून आत्मनिर्भर भारतचे उद्दिष्ट गाठण्यासाठी भारत सरकार मेद इन इंडिया जहाज बांधणीसाठी ७० हजार कोटींची योजना देशात राबवित आहे. आपण सध्या ९० टक्के इंधनाच्या बाबतीत आखाती देशावर अवलंबून आहोत. संरक्षण क्षेत्रात देशांतर्गत उत्पादन वाढवले जात आहे . औषधासाठी लागणारा कच्चा माल आणि दुर्मिळ खनिज देखील मिळवले जात आहेत

२ नोंद

महिला सक्षमीकरण तळापासून बाजारपेठापर्यंत

महिला-नेतृत्वाखालील उद्योगांना बळकट करण्यासाठी आणि त्यांना जागतिक व्यापार प्रणालीमध्ये समाकलित करण्याच्या महत्त्वपूर्ण उपक्रमांतर्गत, वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबईने, ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज आणि गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस यांच्या संयुक्त विद्यमाने, ''महिला सक्षमीकरण, व्यवसाय सक्षमीकरण तळागाळापासून निर्यात बाजारपेठांपर्यंत'' या शीर्षकाखाली एका प्रभावी कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमात वरिष्ठ सरकारी अधिकारी, उद्योगपती, महिला उद्योजक आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग एका समान व्यासपीठावर एकत्र आले. महिला-नेतृत्वाखालील व्यवसायांना स्थानिक बाजारपेठांच्या पलीकडे विस्तार करण्यास आणि जागतिक व्यापारात अर्थपूर्ण सहभाग घेण्यास सक्षम करून देशाच्या विकासातील एक मोठी उणीव दूर करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

आपल्या भाषणात, महाराष्ट्र राज्याचे विपणन आणि प्रोटोकॉल मंत्री, श्री जयकुमार रावल म्हणाले, ''सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांपासून ते मोठ्या उद्योगांपर्यंत, महाराष्ट्राने देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. उत्पादन, सेवा आणि कृषी क्षेत्रात महिला अधिकाधिक प्रेरक शक्ती बनत आहेत, ज्यामुळे सर्वसमावेशक विकासाला चालना मिळत आहे.''

वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबईचे अध्यक्ष आणि ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीजचे अध्यक्ष डॉ. विजय कलंत्री म्हणाले, ''महिला भारताच्या विकासगाथेचा अविभाज्य भाग कशा बनत आहेत, हे पाहणे खरोखरच उत्साहवर्धक आहे. आज, महिलांचा श्रमशक्तीतील सहभाग ४२% पेक्षा जास्त झाला आहे, जो गेल्या सहा वर्षांत जवळपास दुप्पट झाला आहे''

३ चला पर्यटनाला

निसर्गाचा अद्भुत अविष्कार दार्जीलिंग

भारतातील हिमालयाच्या पायथ्याशी असलेले तसेच भारतात नव्हे तर जगात प्रसिध्द असलेले हिल स्टेशन पश्चिम बंगाल राज्यात दार्जिलिंग मध्ये आहे. अतिशय सुंदर नैसर्गिक संपन्न असलेले शहर असून येथे चहाच्या बागा प्रसिध्द आहे. दार्जिलिंगम शहरापासून दहा किलोमीटरच्या अंतरावर रॉक गार्डन असून या बागेत दगड तोडून विविध कलाकृती सर्वांचे लक्ष वेधते. तर रंगीबेरंगी फुलांनी सुशोभित हे गार्डन त्यात एक धबधबा असून तो पर्यटकांना आकर्षित करतो. उन्हाळ्याच्या सुट्टीत येथे फिरण्यासाठी उत्तम ठिकाण आहेदर्जिलिंगमध्ये या हिल स्टेशनवरील सर्वात उंचावर घुम मठ आहे. आठ हजार फूट उंचीवर स्थित याला यिगा चोयलिंग देखील म्हणतात. याची स्थापना १८५० मध्ये लामा शेराब ग्यात्सो यांनी केली होती आणि दार्जिलिंगमधील सर्वात प्राचीन तिबेट मठ मानला जातो. हे मैत्रेय बुद्धाच्या १५ फूट उंच पुतळ्यासाठी देखील ओळखले जाते, तसेच दुर्मिळ बौद्ध हस्तलिखिते, शिलालेखांचे संग्रहाल येथे आहे. येथील आकर्षकाचे केंद्र हे बौद्ध आणि तिबेटी कला पाहण्यास मिळतात. तसेच या डोंगरावराच्या माथ्यावर माँ कालीचे एक सुंदर मंदिर आहबस्तासिया लूपचा रेल्वे ट्रॅक दार्जिलिंगची सर्वात सुंदर रेल्वे मार्ग असल्याचे म्हटले जाते. ट्रॅक एका टेकडी व बोगद्यातून जातो आणि त्याभोवती सुंदर फुलांचे आणि वनस्पती या दिसतात. कांचनजंगाच्या बर्फाने भरलेल्या टेकड्याचे सुंदर दृष्य येथून आपण पाहू शकतात.



**संकलन संयोजन**
**सुबोध रणशेवरे**
**संपर्क -९८३३१४६३५६**
**इमेल -**
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
रविवार २९ मार्च २०२६



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## जवाहर नवोदय विद्यालयाच्या परीक्षेत राजिपचे विद्यार्थी चमकले : जि.प. शाळांतील ३४ विद्यार्थी पात्र

अलिबाग प्रतिनिधी

जवाहर नवोदय विद्यालयाच्या इयत्ता सहावी प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या २०२६-२७ शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश परीक्षेत रायगड जिल्हा परिषद शाळांच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी राखीव असलेल्या ८० जागांसाठी जिल्हा परिषद शाळांचे एकूण ३४ विद्यार्थी प्रवेशपात्र ठरले आहेत.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे राजिपचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी अभिनंदन केले आहे.ङ्कजिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्ती परीक्षा तसेच नवोदय परीक्षेतील यशाचा टक्का वाढावा, या उद्देशाने राजिप शिक्षण विभागाकडून विविध स्तरांवर प्रयत्न करण्यात आले.

सराव परीक्षा, ‘‘विनोबा‘‘ ॲपद्वारे चाचणी आणि मुल्यांकन तसेच प्रथम एज्यूकेशन फाऊंडेशनच्या ‘‘लर्निंग इंप्रूवमेंट प्रोग्राम‘‘चा यात समावेश आहे. शिक्षण विभागातर्फे नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षांसाठी मार्गदर्शिकांची छपाई करून त्या शाळांना वितरित केल्या होत्या. यासोबतच शाळास्तरावरही विशेष मार्गदर्शन करण्यात आले.ङ्कजिल्हा परिषदेकडून राबविलेल्या अशा विशेष उपक्रमांचे हे यश आहे. त्यामुळेच जिल्हा परिषद शाळांतील ३४ विद्यार्थी जवाहर नवोदय विद्यालयासाठी प्रवेशपात्र ठरले आहेत.ङ्कतालुकानिहाय अलिबाग २, उरण १, पनवेल ३, कर्जत ४, खालापूर २, पेण १, सुधागड २, रोहा ३, माणगाव १, महाड १, पोलादपूर ६, म्हसळा १, श्रीवर्धन १, मुरूड २, तळा ४ अशा एकूण ३४ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

**या जि.प. विद्यार्थ्यांची झाली निवड:**

**अर्वा चिखले, धैर्य नफे, वेदांत पाटील, सौरभ घुले, आयशा झा, इश्वरी भांगे, सोहम जाधव, आयुष जोगदंडे, ओम हरपुडे, साई भोईर, मानस चव्हाण, कुशल नारले, आरव पाटील, स्वरा जेवे, अक्ष करंजकर, कार्तिकी शिंदे, आरूष शिंदे, श्लोक मढवी, अक्षरा सुर्यवंशी, अभिजित शिंदे, दिपश्री बिरादार, मधुरा कोलवडकर, प्रतिक चिकणे, अभिनव एकशिंगे, अस्मिता मोरे, जितरत्न गायकवाड, आदित्य गिरीगोसावी, अनुश्री केरलकर, क्षितीज म्हात्रे, आराध्या लाड, आरूषी बोडखे, प्रार्थना ठमके, मंथन पत्रे, मानवी पवार.**

## सिडकोची धडक कारवाई उलवे सेक्टर २९मधिल अनधिक्रुत आरएमसी प्लांट आणि बांधकामे जमीनदोस्त

पनवेल प्रतिनिधी-सुनील जाधव

नवी मुंबईतील अनधिक्रुत बांधकामाविरुध्द सिडकोने आपली धडक मोहीम अधिक तीव्र असा,मुक्त केलेला भुखंड:अदांजे४४००,चौ.मी. निष्कासित बांधकामे:आरएमसी प्लांट



केलेली आहे.पुष्पक(उलवे)नोड,सेक्टर २९ येथील सर्वे नं.४२६मधिल भुखंडावर कोणतेही परवानगी न घेता उभारण्यांत आलेले अनधिक्रुत आरएमसी प्लांट,क्रशर,मिक्सर मशिन आणी २मजली ईमारत सिडकोच्या अनधिक्रुत बांधकामविरोधी पथकाने निष्कासित केली.या कारवाईचा तपशिल जी+२ईमारत,वॉचमेन कॅबिन व ईतर बांधकाम,यंत्रणा१: जेसीबी,१ पोकलेन आणि मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त.सिडकोचे प्रचलित नियमांचे उल्लघंन करणा-यांवर अश्याच प्रकारे कठोर कारवाई सुरु राहणार असल्याचा ईशारा सिडको प्रशासनाने दिला आहे.

## पनवेल परिसरामधे भीषण अपघात

पनवेल प्रतिनिधी-सुनील जाधव

नवी मुबंई,पनवेल येथील कोन फाटा ते रसायनी रोडवर ईडिंया वुल्स सोसायटी जवळ मोटर सायकल आणि स्कुटी यांच्या मधे समोरासमोर जोरदार टक्कर होवुन भीषण



अपघात झाला.या अपघातामधे महेंद्र यादव (रा.कळबोंली) हे गंभीररित्या जखमी झाले.मिळालेल्या माहीती नुसार मोटर सायकल क्रमांक एम एच४६ सिटी ८८५२आणि स्कुटी क्रमांक एमएच ०३इवाय९१७१ यांच्या मधे नजर चुकी मुळे समोरा समोर धडक झाल्याने हा अपघात घडला.अपघाता नंतर परिसरामधे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.दरम्यान या मार्गावर पेट्रोलींग करीत असलेल्या पनवेल वाहतुक शाखेचे पोलिस हवादार संजय जाधव ,संजय गावडे,पोलिस कॉन्सटेबल चंदु सुर्यवंशी व दत्ता उबाळे यांनी तत्काळ वेळ न दवडता नवकार लॉजिस्टिक कंपनीची ॲम्बुलन्स बोलावुन जखमी महेंन्द्र यादव यांना तातडीने कामोठे येथे एमजीएम हास्पिटल दाखल केले. तर जख्मीच्या नातेवाईकांशी संपर्क साधुन त्यांना अपघात घडलेल्याची माहीती देण्यांत आली असुन पुढील तपास पनवेल शहर पोलिस करीत आहे.

## भोंदू बाबा खरात याच्या एस. आय. टी.नाशिक विशेष तपास पथकात कर्तव्यदक्ष अधिकारी पी. आय. रवींद्र मांजरे यांची नियुक्ती झाल्याने प्रोफेसर श्री सदानंद गांधळे ( इंदापूर )यादव, मांजरे परिवार यांच्याकडून हार्दिक अभिनंदन


रायगडचा उत्तर उपसंपादक / मंगेश यादव: नाशिक येथील तथाकथित भोंदू बाबा अशोक खरात याच्या क्रूर कृत्यांच्या एस. आय. टी. विशेष तपास पथकात जिगरबाज, कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून मुंबई क्राईम पी.आय. श्री रवींद्र मांजरे यांची तपास अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल यांचे सासरे (पुणे )इंदापूर गावचे सुपुत्र मा. प्रोफेसर



सदानंद गांधळे, गांधळे परिवार, सोयरे- यादव परिवारासाठी आज आमच्यासाठी, आमच्या नात्यांमध्ये अभिमानाची बाब असल्याने मनःपूर्वक त्यांचे आमच्या परिवाराच्या वतीने आम्ही अभिनंदन करतो आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा देतो जय हिंद जय महाराष्ट्र. ङ्क समस्त गांधळे, यादव, मांजरे परिवार

## पालीत घरगुती कनेक्शन मधून हजारो लिटर पाणी वाया कचऱ्याने गटारे तुडुंब

रायगड जिल्हा उत्तर उपसंपादक / मंगेश यादव :पालीत नगरपंचायतच्या दुर्लक्षा मुळे घरगुती पाणी कनेक्शन मधून दिवसाला हजारो लिटर पाणी वाया तसेच भोई आळी येथील गटार कचऱ्याने भरल्याने कचराकुजून सर्वत्र दुर्गंधी यामुळे



मच्छरांचा त्रास वाढला.आज या उद्या आजूबाजूच्या लोकांना या कूजलेल्या (साठलेल्या) कचऱ्याने आजाराचा सामना करावा लागू शकतो. नगरपंचायतीने तात्काळ या समस्यांचे दखल घ्यावी. जनतेची मागणी.

## निवळी कोष्टेवाडी येथे दि.३0 मार्च ते 0२ एप्रिल या कालावधीत हनुमान जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन

आबलोली (संदेश कदम)

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी चिपळूण तालुक्यातील निवळी कोष्टे वाडी येथील श्री. हनुमान मंदिर येथे श्री. हनुमान जन्मोत्सव सोहळा २०२६ या जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन ३० मार्च २०२६ ते ०२ एप्रिल २०२६ या कालावधीत श्री. हनुमान सेवा मंडळ निवळी कोष्टे वाडी यांच्या वतीने आयोजित करण्यात आले असून या हनुमान जन्मोत्सव सोहळयाला निवळी पंचक्रोशीतील जनतेने बहुसंख्येने उपस्थित राहावे असे जाहीर आवाहन श्री.हनुमान मंदिर निवळी ग कोष्टे वाडी या मंडळाच्या वतीने प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आले आहे. दिनांक ३० मार्च २०२६ रोजी लहान मुलांचे फनी गेम्स खेळण्यात येणार असून बुधवार दिनांक ०१ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ०५:०० श्री. सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली असून सायंकाळी ०७:०० वाजता स्थानिक मंडळाच्या भजनाचा कार्यक्रम होणार असून रात्री १०:०० वाजता लेखक,दिग्दर्शक संतोष पवार लिखित ‘‘हीच खरी फॅमिलीची गंमत आहे‘‘या नाटकाचा नाट्य प्रयोग सादर होणार आहे. या नाटकामध्ये लेखन, आणि गीते संतोष पवार यांनी लिहिले असून या नाटकाला नेपथ्य संदेश बेंद्रे यांचे लाभले असून संगीत अशितोष वाघमारे यांचे असून प्रकाश योजना निखिल सातोपे आणि वेशभूषा हास्या पवार यांनी केली असून ‘‘हीच खरी फॅमिलीची गंमत आहे‘‘या नाट्य प्रयोगातले नामांकित कलाकार कलाकार हर्षदा कर्वे, प्रतीक पाध्ये, मनीषा कुळकर्णी, राकेश शालिनी आणि शलाका पवार, रमेश वाणी, संतोष पवार हे अभिनेते आपला अभिनय सादर करणार आहेत.ङ्क गुरुवार दिनांक ०२ एप्रिल २०२६ रोजी पहाटे ०६:३४ वाजता श्री. हनुमान जन्मोत्सव पारंपारिक पद्धतीने साजरा करण्यात येणार असून त्यानंतर सकाळी ०८:३० वाजता ढोल - ताशे , टाळ - मृदुंग , चिपळी अशा पारंपारिक वाद्याच्या गजरात दिंडी आणि भव्य दिव्य अशीश्री. हनुमंताची पालखी मिरवणूक काढण्यात येणार असून दुपारी १२:३० वाजता सर्वांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून सायंकाळी ०७:०० वाजता हरिपाठ व श्री. हनुमान सेवा मंडळ निवळी कोष्टी वाडी प्रसादीक भजन मंडळाचा भजनाचा कार्यक्रम होईल.



भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालय: जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादक: गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )